CMYK

बीड । सोमवार
२३.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ८३.
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# बीडच्या कंपन्यांत परप्रांतीय मजुरांचा भरणा ना नोंद ना रेकॉर्ड; सगळं काही बेभरोसे !

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात रोजगार निमित्त परप्रांतीय मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आले असून येथील प्रत्येक कंपनीत परप्रांतीय मजुरांचा भरणा आहे. यासह बांधकाम क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात स्थानिक मजुरांना डावलत परप्रांतीय मजुरांना संधी देण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्यात परप्रांतीय मजूर मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांच्या हक्कावर गदा येत असून कमी दरात परप्रांतीय मजूर काम करण्यास तयार होतात. विशेष म्हणजे हे मजूर पूर्ण कुटुंबासह येथे वास्तव्यास राहत असल्याने २४ तास ते कामासाठी उपलब्ध असतात. कॉटन मिल असो इतर अनेक व्यवसाय कामात परींतीयांचा भरणा दिसून येत ▶▶ उर्वरित पान २ वर



● स्थलांतरित मजुरांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे, जेणेकरून त्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकतील. स्थलांतरित आणि स्थानिक लोकांमध्ये समानता वाढवणे, जेणेकरून कोणालाही कमी लेखले जाणार नाही. परप्रांतीय मजुरांची समस्या एक गुंतागुंतीची बाब आहे, ज्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर विचार करण्याची गरज आहे. दोन्ही गटांना सोबत घेऊन चालणे आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्यात कामगार कल्याण अधिकाऱ्याकडून प्रत्येक कंपनीत चौकशी व तपासणी केली असता प्रप्रांतीय मुजरांचा मोठा आकडा बाहेर येण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्यात अवैधपणे मजुरांचा पुरवठा करणारे दलाल ही सक्रिय असून यांच्या मार्फतच मुजरांचा पुरवठा केला जातो. प्रत्येक मजुराचा ओळखपत्र असणे आवश्यक असून संबंधित पोलीस ठाण्यात तो रेकॉर्डवर आवश्यक आहे. एकीकडे बीड जिल्ह्यात बेरोजगारी वाढली तर दुसरीकडे येथील व्यापारी परप्रांतीय मजुरांचा पुरवठा कंपन्यात करून घेत आहे यामुळे स्थानिक मुजरांच्या पोटावर पाय तर प्रांतीय मजुरामुळे भविष्यात बीड जिल्ह्यात मोठी समस्या उद्भवू शकते.

## पाटोद्यात सोयाबीनचे बोगस बियाणे तालुक्यात खळबळ; कृषी विभागाचे दुर्लक्ष ; शेतकऱ्यांचे नुकसान



**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील महासांगवी येथील शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी आपल्या घोलप वस्ती येथील शेतात बुस्टर सोयाबीन जे.एस.३३५ या वाणाचे बियाणे अडीच एकरात पेरले होते मात्र सदर बियाणे हे बोगस निघाले असून ते उगवलं नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तरी याची चौकशी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी गर्जे यांनी केली आहे... याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यातील अनेक कृषी दुकानांमध्ये बोगस बियाणे व खते हे मिलीभगत कृषी विभागाच्या आशीर्वादाने चालू असून ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाई शहरातील मुख्यरस्त्यावर वाहनांची गर्दी करणाऱ्यांना पोलिसांकडून तंबी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी अंबाजोगाईत पोलीस अधीक्षकाकडून जनसंवाद बैठक घेण्यात आली त्या बैठकीत अंबाजोगाईतील प्रतिष्ठित व सर्वसाधारण नागरीकांकडून वाहतुकीचा प्रश्न मांडण्यात आला



होता त्याबाबत माननीय अधीक्षक साहेबांनी अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन यांना शहरातील वाहतुकीबाबत सूचना दिल्यानंतर आज रोजी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड व त्यांची टीम रस्त्यावर उतरून वाहनधारकांना फुटपाथ वरच्या समोर असलेल्या छोट्या मोठ्या व्यावसायिकांना ऑटोरिक्षावाल्यांना तंबी दिली व हे सांगण्यात आले की आम्ही दोन दिवस आपणास तोंडी सांगू व नंतर ▶▶ उर्वरित पान २ वर

## जुगार अड्ड्यावर छापा; आठ लाख ९२ हजाराचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची थेट कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत. दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलंबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती



काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे गैबीनगर तांडा ता.गेवराई येथे काही इसम बी.एस.एन.एल टॉवरचे समोरील इसम नामे संभाजी नाटकर यांचे ऊसाचे शेतातील पत्र्याचे शेडचे बाजुला ऊसाचे शेतामध्ये पैश्याची बाजी लावुन हार जीत ▶▶ उर्वरित पान २ वर

## आझाद मैदानावर सुरु असलेल्या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी व्हावे

### बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

**बीड । प्रतिनिधी**

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या ▶▶ उर्वरित पान २ वर



## पीक कर्ज नाकारणाऱ्या बँकावर उद्या शिवसैनिक धडकणार - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना संपर्क नेते सुनिलजी प्रभु साहेब महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते मा. अंबादासजी दानवे साहेब ,यांच्या मार्गदर्शनाखाली , संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब , जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वाखाली उद्या दि. २३/६/२०२५ रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर




## शेतकऱ्यांनी उच्च प्रतीचे सिमेन वापरुन घरीच दुधाळ गाई तयार कराव्यात : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था ही दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे.आष्टी तालुक्याने दुग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणात क्रांती करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने उच्च प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई तयार करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी



केले. आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित आष्टी यांच्या वतीने मोरेश्वर मंगल कार्यालय येथे दूध उत्पादक शेतकरी चर्चासत्र व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना आ. धस म्हणाले की,आष्टी तालुक्यामध्ये दुधाळ गाईंची संख्या कमी प्रमाणात आहे .ती संख्या वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई (कालवडी ) तयार कराव्यात .त्याचप्रमाणे घरी तयार केलेल्या गाईचा औषधोपचार खर्चही कमी असतो. जनावरांचा आजार खर्च कमी करण्यासाठी गोठा स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे.प्रत्येक शेतकऱ्याने गोठा ▶▶ उर्वरित पान २ वर

### राष्ट्रीय महामार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेणा-या पुढा-यांनी निकृष्ट दर्जाच्या रखडलेल्या गतवर्षी 459 तर....

## यावर्षी 5 महिन्यांत 157 अपघातात बळी गेलेल्यांची जबाबदारी घ्यावी : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या आदेशानुसार २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बीड जिल्ह्यातील लातुर ते लोखंडी सावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव १८ किलोमीटर रस्त्यावरील उर्वरित लांबीचे चौपदीकरण आणि माजलगाव ते केज दरम्यान धारूर जवळच्या ब्लॅक स्पॉट ठरलेल्या घाट या दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. आम्हीच कामे केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या कडुन मंजूर करून आणली म्हणत नितिनजी गडकरी यांचे आभार मानत माजी खासदार प्रितमताई मुंडे व विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनावणे यांची श्रेयवादासाठी दैनिकात पत्रकबाजी सुरू आहे. मात्र याचवेळी गेल्या वर्षी २०२४ मध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर




### ● बीड जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट

एखाद्या ठिकाणी वारंवार होणारे अपघात लक्षात ठेवुन तेथील रस्त्याची स्थिती आणि अपघाताचे कारण शोधून उपाययोजना केल्या जातात.या जीवघेण्या अपघात प्रवण स्थळांना ब्लॅंक पोट म्हणून निश्चित केले जाते. बीड जिल्ह्यात महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट ठरविण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे सिरसाळा ,नित्रुड, नंदगाव डेअरी सायगाव ता.आंबेजोगाई )धारूर घाट, होळेश्वर विद्यालय, एचपी पेट्रोलपंप ते चंदनसावरगाव, सुडी पार्टी ते मांगवडगाव, लोखंडी सावरगाव, धामणगाव, वाघळूज, साबलखेड, पांढरी, पोखरी, चुंबळी फाटा, बामदळवाडी ,मांजरसुंबा घाट, मंझेरी रोड ,पाली , छत्रपती संभाजी महाराज चौक, पाडाशिंगी ब्रिज ,रांजणी ,गढी पूल ,वडगाव ढोक, नायरा पंप गेवराई, बागपिंपळगाव ,नागझरी सिरसदेवी शिवार, मादळमोही पेट्रोलपंप, सावरगाव, पांगर बावडी याठिकाणांचा समावेश आहे.



# 'योग' दैनंदिन जीवनाचा भाग व्हावा !

कोरोना महामारीच्या काळात पुरातन भारतीय संस्कृतीतील आहार विहार, आयुर्वेद यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. योग हा सुद्धा त्यापैकीच एक.आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढावी तसेच फुप्फुसासह एकूणच शरीराचे आरोग्य चांगले राहावे यासाठी काही ठराविक योगासने त्या क्षेत्रातील जाणकार मंडळींनी त्यावेळी सुचवली आणि आपण ती आचरणातही आणू लागलो होतो. ज्यांना कोरोना झाला किंवा ज्यांनी कोरोनावर मात केली अशांना योग्य आहार विहार आणि औषधांसोबत प्रतिदिन योग करण्याचा सल्लाही त्यावेळी आरोग्य खात्याने दिला होता. जसजसा कोरोनाचा प्रभाव



ओसरला, लसीकरण झाले तसतसे नियमित योग कारण्याची सवयही मोडली. आता पुन्हा कोरोनाने डोके वर काढले आहे. भारतभरात कोरोनाचे रुग्ण दिवसांगणिक वाढताना दिसत आहेत. महामारीच्या तुलनेत कोरोनाचा फैलाव होण्याची गती कमी असल्याने आज या रोगाला कोणी गांभीर्याने घेताना दिसत नाही, मात्र आज त्याकडे दुर्लक्ष केल्यास आपल्या दारापर्यंत यायला त्याला वेळ लागणार नाही. त्यामुळे आपले अंतर्गत आरोग्य चांगले राहण्यासाठी आणी रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी पुन्हा एकदा योग आचरायला हवा. वेळात वेळ काढून ठराविक योगासने प्रतिदिन करायला हवीत.

योगविद्या भारतीय ऋषी मुनींनी जगाला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. आज योगविद्येचे महत्व साता समुद्रापार पोहोचले आहे. मानवाला निरोगी आयुष्यासोबत मनःशांती देणारी योगविद्या खरेतर समस्त मानवजातीसाठी एक संजीवनी ठरली आहे. तिचा भारतीयांनी दैनंदिन जीवनात लाभ करून घेणे आवश्यक आहे. आपल्या सुदैवाने योगविद्येचे शास्त्रीय ज्ञान करून देणारी ग्रंथसंपदा तसेच योगाभ्यासाचे वर्ग घेणाऱ्या संस्था आणि मंडळे आज खेडोपाडी उपलब्ध आहेत. सध्याच्या स्पर्धेच्या युगात कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी जीवाची पराकाष्ठा करणारा मनुष्यप्राणी आपल्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करताना दिसतोय. कामाचा आणि कौटुंबिक समस्यांचा ताण मानवाचे जीवनमान अल्प करत आहे अशावेळी दिवसातून थोडासा वेळ काढून ठराविक योगासने केल्यास मनुष्याचे जीवन सुखकर आणि निरोगी होऊ शकते. नुकत्याच झालेल्या जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने ठिकठिकाणी एकदिवशीय योगवर्गाचे कार्यक्रम आयोजित केले गेले होते ; ज्यामध्ये राजकीय मंडळींसह खेळाडू, सिनेसृष्टीतील मंडळीनीही सहभाग घेतला होता, तरुण वर्गही यामध्ये हिरीरीने सहभागी झाला होता. योगासने करतानाच्या, वर्गाला हजेरी लावल्याच्या सेल्फीज यानिमित्ताने सोशल मीडियावर अपलोड करण्यात आल्या होत्या ; मात्र योग हा केवळ एक दिवस करण्याचा कार्यक्रम नव्हे. योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग कसा बनेल यासाठी प्रयत्न करायला हवेत. याबाबत शासनानेही पुढाकार घ्यायला हवा !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

## पान १ वरून पुढे...

### बीडच्या कंपन्यांत....

आहे. कमी पैशात मजूर उपलब्ध होत असल्याने स्थानिक मजुराकडे येथील व्यवसायिकांनी पाठ फिरवली आहे. स्थानिक मजुरांना मजुरी जास्त द्यावी लागते व त्यांच्याकडून काम करून घेण्यास अनेक अडचणी येत असल्याचे अनेक व्यापारी बोलून दाखवतात. परप्रांतीय नेहमी कामासाठी उपलब्ध असतात व त्यांचा मजुरीचा दरही कमी आहे. मात्र बीड शहरातच हजारोच्या संख्येने परप्रांतीय मजूर राहत आहेत यांची नोंद कायद्यान्वये स्थानिक पोलीस ठाण्यात करावी लागते मात्र कंपनी याकडे दुर्लक्ष करत आहे यामुळे अनेक वेळा गुन्हेगारी घडत असल्याचेही चित्र दिसून आले आहे. स्थानिक मजुरांच्या हाताला रोजगार नसल्याने बीड जिल्ह्यात अनेक युवक बेरोजगार दिसतात. यातच मोठ्या प्रम ाणात उत्तर प्रदेश बिहार छत्तीसगड व झारखंड सारख्या राज्यातूनही मजुराचा पुरवठा बीड सारख्या ठिकाणी केला जात आहे. बांधकाम काम असो शहरातील औद्योगिक वसाहतीत दिसणारे यातच शेतीसाठीही आता परप्रांतीय बीड जिल्ह्यात येत असून स्थानिक पातळीवर मजुरांना अधिकचे पैसे द्यावे लागत असल्याने उत्तर भारतीय राज्यातून मजुरांचा पुरवठा स्थानिक पातळीवर केला जात आहे. बीड जिल्ह्याला ही एक मोठी समस्या असून परप्रांतीय मजुरामुळे स्थानिक मजुरांना कामे मिळत असल्याचे दिसून येत आहे. यातच मजुरांचा पुरवठा करणाऱ्या अनेक दलाल मालामाल होत असून या मजुरासोबत थेट वार्षिक करारच केला जात आहे. या परप्रांतीय मजुरांची नोंद स्थानिक पातळीवर करणे आवश्यक असून याकडे मात्र औद्योगिक वसाहतीतील कंपन्या व बांधकाम क्षेत्रातील गुत्तेदारही लक्ष देत नसल्याने एखादी अप्रिय घटना घडल्यास तो मजूर थेट परराज्यात पळून जातो यामुळे पोलिसांनाही तपास करणे अवघड होते. संबंधित मुद्राचा आधार किंवा ओळखपत्र संबंधित पोलीस ठाण्यात जमा करणे आवश्यक असून बीड जिल्ह्यात मात्र या नियमाला हरताळ फासली जात आहे. परप्रांतीय मजुरांची सम स्या महाराष्ट्रात एक गुंतागुंतीची बाब आहे. एकीकडे, स्थलांतरित मजूर राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे योगदान देतात, विशेषत: बांधकाम आणि शेतीसारख्या क्षेत्रांमध्ये. दुसरीकडे, त्यांच्या आगमनामुळे स्थानिक मजुरांवर परिणाम होतो आणि काहीवेळा सामाजिक तणाव निर्माण होतो. परप्रांतीय मजूर कमी वेतनावर काम करण्यास तयार असल्याने, स्थानिक मजुरांना रोजगार मिळणे कठीण होऊ शकते. मोठ्या प्रमाणात स्थलांतरितांमुळे शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची वाढ होऊ शकते, ज्यामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात. भाषिक आणि सांस्कृतिक फरकांमुळे स्थलांतरित आणि स्थानिक लोकांमध्ये गैरसमज निर्माण होऊ शकतात. काहीवेळा परप्रांतीय मजुरांचा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग आढळतो, ज्यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होते. शेतीत काम करण्यासाठी मजूर मिळत नसल्याने, शेतकऱ्यांना पिकांवर परिणाम होत आहे.

### पाटोद्यात सोयाबीनचे...

त्यातच महासांगवीतील शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी पाटोदा शहरातील एका कृषी रामेश्वर कृषी ॲग्रो सर्व्हिसेस मांजर सूंबा रोड दुकानातून बूस्टर सोयाबीन जे.एस.३३५ हे.दि.२८/५/२०२५ रोजी खरेदी केले होते व अडिच एकरात पेरले मात्र हे बियाणे उगवले नसून यामुळे या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या बोगस बियाणे प्रकरणी संबंधित कंपनी व संबंधितावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी केली

## पान १ वरून पुढे...

आहे या बोगस बियाणामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

### अंबाजोगाई शहरातील...

कायदेशीर कारवाही करण्यात येईल दोन दिवसापासून अंबाजोगाई शहर वाहतूक पोलिसांची शहरात वर्दळ वाढल्यामुळे रस्त्यावर वाहने लावणाऱ्यांची संख्या बऱ्यापैकी कमी झालेली दिसून आली त्याच बरोबर रस्त्याच्या कडेला छोटे व्यावसायिक आपल्या दुकानासमोर गाडीवाल्यांना गाडीलावू नये अशी विनंती करत आहेत याबाबत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे,पोलीस निरिक्षक शरद जोगदंड बोलताना मनाले बीड जिल्ह्याचे अधीक्षक नवनीत कावत सरांनी जे आदेश आम्हाला दिलेत त्या आदेशाचे पालन अंबाजोगाई तिल सर्व नागरिकांनी करावे व पोलिसांकडून आपल्यावर कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी यावेळी अंबाजोगाई शहरातील नागरिकांना समजावून सांगण्यासाठी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, एपीआय घुगे, एपीआय कांबळे, पीएसआय घोडके, पोलीस कॉन्स्टेबल, चादर,कॉन्स्टेबल लाड, रोडे, राठोड, आदी कर्मचारी उपस्थित होते

### जुगार अड्ड्यावर...

चा तिर्रट नावाचा जुगार खेळत आहेत. अशी माहीती प्राप्त झाली होती.यावरुन सदर ठिकाणी दोन पंचासमक्ष जावुन छापा टाकला असता सर ठिकाणी आठ इसम गोलाकर रिंगण करुन तिरट खेळताना दिसले.यातील एक इसम पोलीस पार्टीस पाहुन ऊसाचे शेतामध्ये पळुन गेला. उर्वरीत सात इसम ांना ताब्यात घेतले.त्यांची नावे संभजी नाटकर रा.राक्षसभुवन किशोर प्रधान रा.धोंडराई अनिल राठोड रा.ठाकरवाडी तांडा पिकाजी राठोड रा.कुंभेजळगाव संजय शिंदे रा.धोंडराई रविंद्र कोठी रा.गेवराई शेख जावेद रा. रा.राक्षसभुवन असे आहेत.सदर इसमांचे ताब्यातुन चार मोटार सायकल ,एक चार चाकी वाहन व १०८०० रोख रक्कम असा एकुण ०८ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर सात इसमाविरुध्द पोलीस ठाणे चकलंबा येथे महाराष्ट्र जुगार कायदान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कामगिरी नवनित कॉंवत पोलीस अधीक्षक,बीड सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि शिवाजी बांटेवाड स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने , पोह/ महेश जोगदंड, राजु पठाण, राहुल शिंदे, पो शि/बप्पासाहेब घोडके, चालक गणेश मराडे यांनी मिळुन केलेली आहे.

### आझाद मैदानावर...

वतीने दिनांक ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी व आपल्या हक्काचा टप्पा वाढीचा निधी पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे. राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला होता. दरम्यान निवडणुका

## पान १ वरून पुढे...

होऊन पुन्हा शिवसेना भाजपाचे सरकार सत्तेत आले. या नवीन सरकारच्या विधिमंडळाची दोन अधिवेशन पार पडली, परंतु या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झाली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. परंतु सरकारने आमचा, आमच्या वयाचा, आमच्या सेवेचा आमच्या घरांचा आणि घरातली व्यक्तींचा विचार करून आम च्या पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षकांसाठी कार्यरत असणारी मातृ संघटना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा १८ वा दिवस आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर , उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर , परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांनी उच्च...

आठवड्यातून एकदा तरी निर्जंतुक करणे आवश्यक आहे. तसेच मुरघास करण्यासाठी बॅगचा वापर न करता जमिनीवर हौद करून मुरघास केल्याने त्यावर बुरशी येत नाही व मुरघास खराब होण्याचे प्रमाण अत्यल्प असते.यासाठी शेतकऱ्यांनी जमिनीवर हौद करूनच उच्च दर्जाची मका वापरून कणसासहित मकाचा मुरघास करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेत डॉ.जालिंदर वांढरे, डॉ. संतोष गवारे, डॉ. मंगेश ढेरे डॉ. बाबासाहेब कुंभार, डॉक्टर संदीप शिंदे, डॉ. धनंजय राजगुडे डॉ. शशिकांत कारखेले या पशुवैद्यकीय डॉक्टर व पशुधन विकास अधिकाऱ्यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये दुधाळ गाईची निवड करणे, पशु आहार व्यवस्थापन करणे, जनावरांचे घरगुती प्राथमिक उपचार व आयुर्वेदिक उपचार करणे, वंध्यत्व निवारण व दुबार ए.आय. करण्याचे कारणे व उपाययोजना, वंशावळ सुधारणा कृत्रिम रेतन व स्वार्टेड सिमेंन्सवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे,दिनकर दाणी मामा,मोहन झांबरे सर्व संचालक मंडळ तालुक्यातील सर्व छोटे मोठे व मध्यम दूध उत्पादक शेतकरी दूध संकलन करणारे चेअरमन महिला दूध उत्पादक शेतकरी

## पान १ वरून पुढे...

मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पीक कर्ज नाकारणाऱ्या ...

सकाळी ठिक ११ वाजता स्टेट बँक आठ इंडिया जालना रोड बीड येथे बँकांची शाळा हा उपक्रम शेतकऱ्यांनाच्या विविध प्रश्नांवर राबविण्यात येणार आहे त्यामध्ये शेतकऱ्यांना सिबिल मागितले जाते ,पहिलं थकीत कर्ज भरा म्हणून सांगितले जाते,अशा विविध अडचणी सांगितल्या जातात व शेतकरी मेटाकुटीला येतो या सर्व बाबींचा जाब विचारण्यासाठी उद्या संपूर्ण महाराष्ट्रात राष्ट्रीयीकृत बँकांवर शिवसैनिक धडक मारणार आहेत त्यानुषंगाने आपल्यालाही बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडिया जालना रोड येथे जाऊन संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारुन शेतकऱ्यांना पीक कर्ज व इतरही कर्ज देण्यासाठी सुरळीत करायचे आहे तरी शिवसैनिक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्यासह तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघण,युवा नेते मुकेश भैया घुमरे , युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके , उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदकुमार येवले, उपतालुकाप्रमुख अशोक सगळे , उपतालुकाप्रमुख नितीन नवले ,तालुका सहसचिव संदिप भानप यांनी केले आहे.

### राष्ट्रीय महामार्गाच्या...

अपघातात ४५९ जणांनी आपला जीव गमावला तर ३९७ जण गंभीर जखमी झाले होते. तर जानेवारी २०२५ ते मे २०२५ या गेल्या ५ महिन्यात २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असून व १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. निकृष्ट रस्ते, गुळगुळीत रस्त्यावरील गतिरोधकांचा अभाव, दिशादर्शक फलक नसणे आणि रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृतीच्या नावाखाली फोटो सेशन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट आहेत.याबाबतीत मात्र केवळ सामाजिक कार्यकर्ते यांनीच वारंवार प्रशासन व सरकारला निवेदन,आंदोलनाद्वारे जागे करण्याचा प्रयत्न केला असुन आज श्रेयवादासाठी धडपडणारे लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प होते त्यामुळे या अपघातांची जबाबदारी सुद्धा त्यांनी घ्यायला हवी अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर गेल्यावर्षी जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान ४५९ जणांना अपघातात जीव गमवावा लागला असुन ३९७ जण गंभीर जखमी झाले आहेत तर यावर्षी जानेवारी २०२५ ते मे २०२५ दरम्यान २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असुन १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. रस्त्यांची कामे ठरलेल्या कालावधीत पूर्ण न करता रखडलेले रस्ते, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उद्घाटनापुर्वीच रस्त्याला तडे जाणे, मोठमोठ्या भेगा पडणे ज्यात वाहनांचे चाक अडकुन अपघात होणे, अपघात प्रवण स्थळी गतिरोधकांचा अभाव, महामार्गावर अनेक ठिकाणी वळणावर सुचना व दिशादर्शक फलकांचा अभाव व सिग्नल यंत्रणा नसणे आदी असुविधांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले.सामाजिक कार्यकर्ते यांनी यावेळी आवाज उठवला असताना लोकप्रतिनिधींनी मात्र याकडे दुर्लक्ष करत मुग गिळून गप्प बसल्याचे दिसून आले.यासंदर्भात आवाज उठवण्याचे टाळले.आत्ता मात्र स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपरीषद निवडणुकांच्या तोंडावर श्रेयवादाची पत्रकबाजी सुरू असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## पान ४ वरून पुढे...

### लोकलढा पाणी...

बाबासाहेब नागरगोजे, शंकर पटुळे व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा करताना लोकलढा आंदोलनाचे समन्वयक म्हणाले, की जायकवाडी धरणाच्या पाण्याशिवाय शिरूर, मातोरी, चकलांबा ते तालखेड, एकदरा पर्यंतच्या पाण्यापासून वंचित असलेल्या भागाचा विकास होणार नाही. शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, स्थलांतर, शेतकर्यांच्या मुलांचे लग्न, गर्भाशय काढणे असे सामाजिक प्रश्न दूर करून शेतकर्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी लिफ्ट करून भगवान गडाच्या पायथ्याशी सोडणे गरजेचे आहे, भगवान गड ते तारखेपर्यंत उपकालवा करावा, सिंदफणात पाणी सोडून साखळी बंधारे करावेत या योजना करणे गरजेचे आहे. यासाठी शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव व वडवणी तालुक्यातील गावांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. यावर बोलताना महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले, की शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असलेल्या या आंदोलनास भगवानगडचा आशीर्वाद आहे. या मागण्यांसाठी जी मदत लागेल, ती संपूर्ण मदत आपण करू, असेही महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले. महंतांनी पूर्ण सहकार्याचे आशीर्वाद दिल्याने लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंतांचे आभार मानले.

### जिल्हाधिकारी बीड...

आत्महत्या न-करण्याचे करण्याचे आवाहन केले. तसेच बालविवाह संदर्भात मार्गदर्शन करून सर्व उपस्थितांना शपथ देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर मध्ये प्रशासनाच्या वतीने सं.गां.यो. लाभार्थी यांचे पात्र आदेश, शेतकरी आत्महत्या ग्रस्त वारसांना मंजुरी आदेश, नवीन पात्र मतदारास मा. भारत निवडणूक आयोग यांचे ओळखपत्र वाटप करण्यात आले, ऑनलाइन रेशन कार्ड लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले, भटके जाती जमातीच्या लाभार्थी यांना जातीचे प्रमाणपत्र, धरणग्रस्त प्रमाणपत्र, पात्र लाभार्थी यांना घरकुल प्रमाणपत्र देण्यात आले, गरोदर महिला यांना बेबी कीट चे वाटप केले.

### शिवाजी पाटोळे...

प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे, शिक्षक नेते उत्तमराव पवार, गिरीश देशपांडे, अशोक जाधव, उमाकांत भद्रशेट्टी सुभाष क्षीरसागर, मुख्याध्यापक महादेव जाधव राजेंद्र कुन्हे, अभिषेक राऊत, सुरेश पेशकार , भाऊसाहेब देशमाने, प्रकाश राठोड यांची उपस्थिती होती. शिवाजी पाटोळे हे २९वर्ष १० महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले त्यांनी सन १९९५ ते २००३ या कालावधीत सेवक, प्रयोगशाळा परिचर या

## पान ४ वरून पुढे...

पदावर सेवा केली सन २००६ मध्ये पाडळी हायस्कूल पाडळी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली सन२०१८ पासून कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कैलास पाटोळे, उत्तमराव पवार, गिरीष देशपांडे, अण्णासाहेब थिटे, नानासाहेब काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पाटोळे यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके, विजय सरवदे, सहदेव खांडे, शिवाजी देवमाने, अविनाश वाघ, दत्तात्रय दुधाळ, प्रशांत सुलाखे यांच्यासह मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला- पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर शेवटी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### सद्गुरु संत...

पसरली. बाळु मामाच्या चमत्करांसाठी आणि साध्या सरळ स्वभावासाठी प्रसिद्ध होते त्यांनी अनेक भक्तांच्या अडचणी सोडविल्या आणि लोकांना नेहमी चांगली शिकवण दिली. बाळु मामा म्हणायचे माझ्या मेंढ्या जरी कुणी नाही संभाळयाल्या तरी डोंगरावरची दगड संभाळ करतील असा बाळु मामांनी संदेश दिला. त्याच औचित्यवर काल महिला खुप मोठ्या प्रमाणात मेंढ्या सांभाळण्यासाठी गेल्या होत्या. पालखी क्र. ०३ मध्ये एकुण सहा कळंप होती प्रत्येकी एका कळपात १० ते १२ महिला होत्या. सद्गुरू संत बाळूमामाच्या पालखी येथे किर्तन सोहळा जमाले परिवारातर्फे आयोजित करण्यात आला आहे. व ह.भ.प. शंकर महाराज चिचकर महाराजांची उद्या दि.२४/०६/२०२५ मंगळवार रोजी रात्री ७ ते ९ पर्यंत किर्तानीची सेवा होईल संगीताची साथ म्रदागाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज खोटे व शिवशंभो वारकरी संस्था सोन्नाखोटा हे देतील महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महादेव जमाले, दत्तात्रय जमाले व आत्माराम जमाले यांनी केले.

### चराटा प्राथमिक....

आजच्या योग दिनानिमित्त येथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर काकड एम के साहेब व डॉक्टर संजना गोपवाड मॅडम व आरोग्य कर्मचारी श्री.गव्हाणे एस एस, नेटके सर, टाकसाळ सर, घोगरे सर, सारुख सर, जाधव सर,खरात माऊली,शिंदे बाबुराव, श्रीमती रांजवण तसेच आरोग्य सेविका श्रीमती घरत,देवलकर,तांदळे व परिचर श्री उबाळे अप्पासाहेब,उबाळे ब्रम्हदेव, बासर भरत,सुनिता कदम आणि आशा वर्कर श्रीमती बागलाने, गवते, रोडे आदी, तसेच चराटा ग्रामस्थांची आलोकनीय उपस्थिती होती.

## पान ४ वरून पुढे...

### अपात्र केलेल्या...

यांनी आ.श्रीकांत भारतीय यांच्या मार्फत विधान परिषदेत आवाज उठवला होता. तसेच ग्राम विकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या कडे पाठपुरावा केल्यानंतर या पुढे एक वर्षाची मुदत वाढ देण्याची घोषणा विधानसभेत केली होती. त्या नुसार महाराष्ट्र शासनाने दि. १ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर आदेशाच्या प्रारंभीच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या /सरपंचाच्या/ सभासदाच्या अध्यक्षांच्या आणि सदस्यांच्या व सभापतीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ या आदेशाच्या दिनांकपासून बारा महिन्याची मुदत शासन राजपत्र दि. ३०/०४/२०२५ अन्वये देण्यात आली त्या मुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/सदस्यांना पात्र करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या सरपंच व सदस्य यांनी आपला पदभार घेऊन कामकाज सुरू केले आहे. अखेर अपात्र ठरवलेल्या सरपंच सदस्य यांना पात्र करण्याच्या लढ्याला यश मिळाले असे मत सरपंच परिषद मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे व राष्ट्रवादीचे नेते प्राध्यापक ईश्वर मुंडे यांनी व्यक्त करून या लढ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणा-या सर्वांचे आभार मानले आहेत.

### छत्रपती शाहू...

प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर बहुजन समाज पार्टीचे प्रदेश पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी विधानसभा पदाधिकारी, सेक्टर बूथ चे पदाधिकारी व कार्यकर्ते हे मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की,छत्रपती शाहू महाराज यांची जयंती आपण सणांसारखी साजरी केली पाहिजे ! म्हणून बहुजन समाज पार्टी संपूर्ण देशामध्ये शाहू महाराजांची जयंती ही मोठ्या उत्साहात साजरी करत आली आहे. सन २००२ मध्ये मान्यवर कांशीराम साहेबांनी देखील कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने आरक्षण शताब्दीचा भव्य दिव्य असा कार्यक्रम आयोजित करून संपूर्ण महाराष्ट्राला दाखवले होते की,आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांचा सन्मान फक्त बहुजन समाज पार्टीच करत आहे.त्याच धर्तीवर २६ जून २०२५ ला देखील महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने पुन्हा एकदा कोल्हापूर येथे शाहू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या नंतर महाराष्ट्रामध्ये पुन्हा एकदा बहुजन समाज पार्टीची लाट आल्याशिवाय राहणार नाही कारण महाराष्ट्रातील शाहू प्रेमींना याची पुन्हा एकदा जाणीव होणार आहे की,ज्यांनी आपल्याला आरक्षण दिलं असे छत्रपती शाहू महाराज यांचा मानसन्मान बहुजन समाज पार्टी शिवाय दुसरं कोणीही करू शकत नाही.आजवर शाहू महाराजांच्या नावाने अनेक लोकांनी

## पान ४ वरून पुढे...

राजकारण केले,सत्ता उपभोगली परंतु त्यांनी शाहू महाराजांचा सन्मान कधीच केला नाही.या उलट उत्तर प्रदेश मध्ये बहुजन समाज पार्टीची सत्ता आल्याच्या नंतर शाहू महाराजांच्या नावाने विद्यापीठ,महाविद्यालय स्मारके उभे करून व शाहू म हाराजांच्या नावाने जिल्ह्याची निर्मिती करून एक इतिहास नवा घडवून दाखविला आहे. कोल्हापूरला होणाऱ्या या विशाल शाहू मेळाव्यात बीड जिल्ह्यातून शेकडो कार्यकर्ते सहभागी होणार आहेत,आपण देखील हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बहुजन समाज पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष प्रशांत वसनिक यांनी केले आहे.

### योगामुळे मन...

आले होते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी व कर्मचाऱ्यांनी योगाचे प्रशिक्षण घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृष्णा कदम यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खेत्रे सर यांनी केले. तर आभार बारजगेसर यांनी मानले. यावेळी पत्रकार विष्णु राठोड, कन्या शाळेतील सर्व कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

### श्री वैद्यनाथ विद्यालय...

व शालेय काळातील आठवणी शेअर करताना वातावरण अगदी भावनिक झाले. वर्गातील काही विद्यार्थ्यांनी शाळेतील विनोदी प्रसंग, गमतीदार आठवणी रंगवून सांगितल्या, ज्यामुळे उपस्थितांमध्ये हास्याचे क्षण रंगले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये काही विदेशात कार्यरत असून, त्यांनी ऑनलाइन स्वरूपात सहभागी होत आपले मनोगत व्यक्त केले. हे पाहून स्नेहम ेळाव्याचे आयोजन अधिक संस्मरणीय ठरले. या मेळाव्यासाठी विशेष आकर्षण म्हणून शाळेचा वर्गजमवून 'क्लासरूम सीन' तयार करण्यात आला होता. काही माजी शिक्षकांनी त्या वर्गात पुन्हा एकदा थोडक्यात शिकवणी सत्र घेतले, जे क्षण अक्षरशः सर्वांच्या आठवणीत कायमचे कोरले गेले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेत एकमेकांशी पुन्हा संवाद साधला. या स्नेहमेळाव्यामुळे आपल्या सर्वांच्या नात्यांना नव्याने बहर मिळाला, असे अनेकांनी व्यक्त केले. भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम दर ५ वर्षांनी आयोजित करण्यात यावेत, असा निर्धार या सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला. या यशस्वी आयोजनामागे आयोजन समितीतील श्री.श्रीकांत रंगनाथ खके, सौ. रुपाली सूर्यकांत कापसे (वाकडे ) श्री.सचिन बापुराव डाके यांचा मोलाचा सहभाग होता. सर्व उपस्थितांनी एकमुखाने या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. दरम्यान, या स्नेहमेळाव्यात २०००-२००१ बॅचच्या मयत यांना उपस्थित शिक्षकवृंद व माजी विद्यार्थ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी 421 कोटींची कामे मंजूर

## खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ

**माजलगाव। प्रतिनिधी**

जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहूतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही म हत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.



● **या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न- अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मंजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल.**

● **मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो. -खा.बजरंग सोनवणे, बीड.**



*बीड : मधू मखी पालन प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर जिल्हा कृषी अधीक्षक साळवे ,वाघ , जाधवर , यांनी विठ्ठल घरत शेती निष्ठ शेतकरी., प्रगतील शेतकरी श्रीकांत कुलकर्णी व प्रगतीशील शेतकरी संतोष तेलप यांचा सत्कार करण्यात आला.*

# श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालय येथे जागतिक योग दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अशोक घरत सर यांनी केले तर सूत्रसंचालन चव्हाण युवराज सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रकटे भीमराव यांनी मानले. योग शिक्षक श्री चव्हाण युवराज यांनी विद्यार्थ्यांना योगासनातील जीवनातील महत्त्व समजावून सांगून विद्यार्थ्यांना वेगवेगळे योगाचे प्रात्यक्षिके व सूर्यनमस्कार विद्यार्थ्याकडून करून घेतले. योग आजच्या काळाची गरज आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. करा योग ,रहा निरोग असा सल्ला त्यांनी दिला

# दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा ? 2654 कोल्हापुरी बंधारे गेटविना

## अजितदादा बीड जिल्ह्यातील १७ सिंचन प्रकल्प रद्द केले निदान आता ५२ कोटी निधीची तरतूद तरी करा: डॉ.गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे.मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतुयातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधा-यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात डोंगररांगा आहेत.या ठिकाणाहून अनेक नद्यांचा उगम होतो. डोंगररांगात पडणारे पाणी आडवुन सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी मागील अनेक वर्षातून विविध सरकारने प्रयत्न केलेले आहेत. आजवर मराठवाड्यातील नद्यांवर २६५४ कोल्हापुरी पद्धतीने बंधारे बांधण्यात आलेले आहेत. या बंधार्यावर कोट्यावधींचा खर्चही झालेला आहे. अर्थातच इतका खर्च केल्यास बंधा-यात पाणी साठणे आवश्यक आहे .परंतु असे होताना मराठवाड्यात तरी दिसत नाही. आजच्या घडीला हिंगोली वगळता २६३४ बंधा-यांना गेटची आवश्यकता आहे.

# ताण तणावापासून मुक्त राहण्यासाठी योगासने करणे महत्त्वाचे -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

धकाधकीच्या जीवनात ताणतणावातून तणावमुक्त राहण्यासाठी शारीरिक व मानसिक क्षमता कायम राहावी यासाठी दररोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.




योग हा पारंपारीक पद्धतीने पाच हजार वर्षापासून चालत आला असून पूर्वी वडीलधारी मंडळी योगाच्या माध्यमातून स्वतःला निरोगी व तणावमुक्त ठेवण्यासाठी योगासने, ध्यान साधना करत असत. विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी व एकाग्रता साधण्यासाठी ध्यान धारणा (मेडीस्टेशन) करणे ही काळाची गरज झाली असून शारिरीक व मानसिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी ध्यान साधनेचा जीवनात नियमित उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना केले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षण विभाग, विविध योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे इनडोअर हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करूनकरण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो. माणसाच्या जीवनात योगाचे अत्यंत महत्त्व असून आजची आपली जीवनशैली बदलल्यामुळे तरूण पिढी नेहमीच तणावाच्या वातावरणात वावरत असते. यापासून मुक्त राहण्यासाठी योगासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक नागरीकांनी योगा केला पाहिजे.

# शिदेवाडी येथे ट्रक चालकाच्या घरी दरोडा: गुन्हा दाखल

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शिदेवाडी येथील अशोक दरेकर ट्रक चालकाच्या घरी दरोडा पडल्याची घटना घडली आहे. पहाटे ४:३० दरम्यान अज्ञात व्यक्तींनी घरात घुसून चोरी केली,अशी माहिती समोर येत आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

तालुक्यातील शिदेवाडी येथील दरेकर यांच्या घरी पहाटे चार च्या दरम्यान दरवाजा तोडून ६५ हजार रुपये चा ऐवज चोरीला गेला असून मीरा दरेकर यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली.

याविषयी सविस्तरपणे माहिती अशी की तालुक्यातील शिदेवाडी तेथील मीरा दरेकर हे मुलाबाळासह राहत असुन दिनांक १८/०६/२०२५ रोजी नेहमी प्रमाणे माझी दोन मुले घरात झोपले होते मी व माझी मुलगी घराच्या बाहेरील अंगणामध्ये (मोकळ्या जागेत) घराचे दरावाजा लावून झोपले होते. अशोक हा ड्रायव्हर असल्याने ते पुणे येथे गेले होते. दिनांक १९/०६/२०२५ सकाळी ०४.३० वाजता झोपेतून उठले असता घराच्या दरावाजा उघडा दिसला त्यामुळे मी घरामध्ये जावुन पाहीले असता माझी दोन्ही मुल झोपलेली होती व घरातील कपाट उघडे होते. कपाटात पाहीले त्यातील साडचा व कपडे अस्त-व्यस्त अवस्थेत पडलेले होते, तसेच कपाटात मी ठेवलेले दागिने व पैसे पाहिले असता ते मिळून आले नाही त्यामुळे दरेकर यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन फिर्याद दाखल करून अज्ञाता विरोधात भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ अंतर्गत ३०५(र) गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद भुतेकर करत आहेत.

# धर्मवीर छावा संघटनेची बीड जिल्हास्तरीय बैठक संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शासकीय विश्रामगृह अहिल्या नगर रोड बीड येथे पार पडली बैठकीमध्ये बीड जिल्हामधील वाढत्या जातीवादावर व महिला अन्याय अत्याचार आणि आरोग्य शिक्षण शेती नोकरी यावर सखोल चर्चा करण्यात आली बीड जिल्हातील सामाजिक सलोखा राखण्यासाठी धर्मवीर छावा संघटना शहर गाव खेड्यापर्यंत सामाजिक सलोख्यासाठी संघटनेचे पदाधिकारी प्रयत्न करणार असे धर्मवीरच छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश उगले पाटील यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या त्यांच्या सूचनेचे पालन करून धर्मवीर छावा संघटनेचे पदाधिकारी गाव खेड्यातील जातीय सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करतील महिला अन्य अत्याचार शासनाच्या आरोग्य विषय धोरण नोकरी शिक्षण यावर संघटनेची पदाधिकारी व कार्यकर्ते जिल्हा भर जनजागृती व गोरगरीब कष्टकरी शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणार असल्याचे गणेश उगले पाटील यांनी सांगितले काही महिला पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या या बैठकीसाठी अंकुश सकुंडे, गणेश बनसोडे, भाऊसाहेब निंबाळकर, कृष्णा शेळके, दीपक डाखोरकर, कावेरी खेमाडे, शिवकन्या म्हस्के, सचिन जाधव, ओमकार नाटकर, तानाजी पठारे, कृष्णा हिंगे, संतोष सकुंडे, आदित्य पोटफाडे, महेश महिपाल, अशोक खोत, गंगाराम सकुंडे, बाळासाहेब गायकवाड, विकी कोरडे, निखिल पोटफोडे इत्यादी अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# खंडणीच्या गुन्ह्यातून आरोपींची निर्दोष मुक्तता: अॅड. शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन खंडणीच्या आरोपातून आरोपी यशवंत हनुमंत पवार, व शिवराम बारकू शिवगिरे राहणार बहादरपुर ता. जि. बीड यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केलेली आहे, घटनेची हकीकत आशिकी मौजे बहादरपूर ता. जि. बीड येथील फिर्यादी कांतीलाल गहिनीनाथ



कोळेकर यांनी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि.२३/०१/२०२३ रोजी तक्रार दाखल केली होती की, त्यांना व इतरांना वरील दोन आरोपी यांनी रोजगार हमी योजनेतील विहीर मुजरा ऐवजी जे.सी.बी.ने खोदायचे असतील तर आम्हाला प्रत्येकी २०,००० रुपये खंडणी द्यावी लागेल त्या अनुषंगाने तत्कालीन सरपंच, उपसरपंच ,व ग्रामसेवक साहेब यांनी उपरोक्त आरोपींच्या विरोधात ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन आरोपी हे गावगुंड आहेत असे ठरवून आरोपींच्या विरोधामध्ये फिर्याद दाखल केली होती, सदर फिर्यादीच्या अनुषंगाने तपाशी अधिकाऱ्यांनी एकूण २० साक्षीदारांचे जबाब नोंदवून मा. न्यायालयमध्ये दोषारोप पत्र दाखल केले होते, सदर दोषारोपामध्ये आरोपींनी घटने पूर्वीही अनेक जणांकडून खंडणी वसूल केल्याचे, तसेच माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करून लोकांकडून अवैद्य खंडणी गोळा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मा. न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल केल्याचे सांगण्यात आले होते, त्या अनुषंगाने मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयात आरोपींच्या विरोधात . ठ.उ.उ.पे १४८/२३ अन्वय शासन वि. यशवंत पवार असा खटला चालला, सरकारी पक्षाच्या वतीने, तपासण्यात आलेल्या साक्षीदारापैकी एकही साक्षीदार फितूर नसताना, मा. न्यायालयाने आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला बचाव ग्राह्य धरून आरोपीची सदर गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्तता केलेली आहे, आरोपीच्या वतीणे अॅड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली, त्यांना अॅड. विशाल कदम, अॅड. अभिषेक बहिर, अॅड. अमोल तिडके, अॅड. माऊली डाके, अॅड. विवेक डोके, अॅड. प्रदीप दराडे, अॅड. राजकुमार धरणे, अॅड. मुकुंद लोणकर,यांनी सहकार्य केले.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ९३९/२०२५**

**सुनिता व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- (१) सुनिता अशोक झोडगे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. कानडी घाट, ता. जि. बीड
(२) अमोल अशोक झोडगे, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. कानडीघाट, ता. जि. बीड
(३) जनाबाई रामभाउ झोडगे, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम रा. कानडीघाट, ता. जि. बीड

विरुद निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत अशोक रामभाउ झोडगे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अशोक रामभाउ झोडगे यांचा मृत्यु दि. २४/०५/२०२५ रोजी विवेकानंद हॉस्पीटल, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदारक. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क्र. ३ ही मयताची आई आहे. मयतास मुलगी नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अशोक रामभाउ झोडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० माहे जून २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिश दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ जुलै २०२५.**

(अॅड. एस बी नांदे)

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

शिक्का

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

सोमवार, दि.२३ जून २०२५ पान ४



*बीड: श्रीक्षेत्र मुक्ताईनगर येथून आषाढी वारीसाठी पंढरीकडे प्रस्थान ठेवलेल्या संत मुक्ताईंच्या पालखीचे रविवारी (दि.२२) शहरातील सुभाष रोडवर आगमन झाल्यानंतर माजी मंत्री प्रा.सुरेश नवले यांनी संत मुक्ताई यांच्या पालखीचे सपत्नीक दर्शन घेतले.*

# मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणीला व्यवसायासाठी कर्ज देणार फक्त घोषणा; अमलात कधी येणार ?




**▸सावता सेनाच्या विभागीय अध्यक्षा वर्षा शिंदेचा सरकारला सवाल**

**पाटोदा ।** प्रतिनिधी

महिलांच्या सशक्ती करणासाठी फडणवीस सरकारने मोठमोठ्या घोषणा केल्या, 'लाडकी बहिण' योजने अंतर्गत महिलांना व्यवसायासाठी एक लाख रुपय कर्ज देण्याचे आश्वासन दिले. मात्र आजपर्यंत ही योजना केवळ कागदावरच दिसते आहे. प्रत्यक्षात लाभ मिळाल्याचे चित्र अजून कुठेही दिसले नाही, अशी घणाघाती टीका सावता सेना महिला आघाडीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ.वर्षा शिंदे यांनी केली.त्या म्हणाल्या, सरकार 'लाडकी बहिण' म्हणून महिलांना ओळख देत आहे हे स्वागतार्ह आहे, पण त्या बहिणीला स्वतःचा व्यवसाय उभा करायचा असेल, तर कर्जाच्या नावाखाली फक्त आश्वासन देण्यात येत आहे. आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय महिलांचे खरे सशक्तीकरण शक्य नाही. वर्षा शिंदे यांनी पुढे सांगितले की, अनेक महिला आजही सरकारी दारात हेलपाटे घालत आहेत. बँकांमध्ये अर्ज घेतले जात नाहीत, अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जाते. त्यामुळे ही योजना प्रत्यक्षात राबवली जात आहे की नाही, यावर प्रश्नचिन्ह उभे राहते.त्यांनी सरकारला आवाहन केले की, योजना जाहीर केल्यानंतर तिला वेळेत आणि प्रभावीपणे अमलात आणणे हे सरकारचे कर्तव्य आहे. महिलांच्या अपेक्षांशी खेळू नये. अन्यथा सावता सेना महिला आघाडी रस्त्यावर उतरून आवाज उठवेल. असा इशारा सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षा शिंदे यांनी दिला आहे.

## लोकलढा पाणी आंदोलनास भगवानगडचा आशीर्वाद

### महंत नामदेव महाराज शास्त्री, समन्वयकांनी मांडली भूमिका



**▸महंतांच्या आशीर्वादाने लोकलढ्यास बळ–लोंढे**

**सर्वसामान्य कुटुंबातील तरूण व शेतकरी यांनी आपल्या भागातील शेती बारामती पॅटर्न प्रमाणे बारमाही पाणीदार करण्यासाठी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या लोकलढ्यास महंत शिवाजी महाराज, महंत नामदेव महाराज शास्त्री, उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्यासह साधुसंत, वारकरी संप्रदायातील अधिष्ठाण असलेले व्यक्ती यांचे आशीर्वाद मिळाले आहेत. महंतांच्या आशीर्वादामुळे या लोकलढा आंदोलनास बळ मिळाल्याचे मत समन्वयक राहुल लोंढे यांनी व्यक्त केले.**

**बीड ।** प्रतिनिधी

जायकवाडीच्या पाण्यासाठी १४० गावांनी एकत्र येत जे लोकलढा आंदोलन उभे केले आहे, हे शेतकरी व ग्रामस्थांच्या पिढ्यानपिढ्या कल्याणाचे आंदोलन आहे,या आंदोलनास श्री क्षेत्र भगवान गडचे आशीर्वाद असल्याचे प्रतिपादन महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी केले. लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंत नामदेव महाराज शास्त्री यांची भेट घेऊन भूमिका मांडली यावेळी महंत नामदेव महाराज शास्त्री बोलत होते.

यावेळी बाबुराव जेठे, राजाभाऊ महाराज कुटे, विठ्ठलराव शेळके, पोलीस पाटील काशीनाथ जोगदड, माजी सरपंच लक्ष्मण तात्या नागरगोजे, शिवहारी नागरगोजे, चेअरमन भाऊसाहेब जोगदंड, विजयकुमार करपे पाटील, शामराव घुगे, गोविंद माने, बालासाहेब शेरकर, गणेश जाधव, पत्रकार संतोष भारती, राहुल लोंढे, रामेश्वर पवळ, अण्णासाहेब देवगुडे मामा, रामचंद्र पाटील चव्हाण,

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिकारी बीड यांनी पाटोदा तालुक्यातील नागरीकांची मने जिंकली

**पाटोदा ।** प्रतिनिधी

मौजे कुसळंब ता. पाटोदा,जि. बीड. येथे, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम छत्रपतीशिवाजीमहाराजमहाराजस्वसमाधानशिबीर आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन तहसिल कार्यालय पाटोदा व महसूल विभागाने केले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी मा. श्री विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड मा.श्री.हरिष धार्मिक अप्पर जिल्हाधिकारी,बीड तसेच मा. श्रीम. वसिमा शेख उपविभागीय



अधिकारी,पाटोदा मा. श्री.दत्तात्रय निलावाड तहसिलदार,पाटोदा , जिप सदस्य माऊली जरांगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदेपा, पाटोदा महसुलचे सर्व कर्मचारी हे उपस्थित होते.

मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी महसूल विभागाअंतर्गत सं.गां.यो., आपले सरकार केंद्र, महिला बचत गट इत्यादी वेगवेगळ्या कक्षास भेट देऊन पाहणी केली . यावेळी विविध विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मा. जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या नविन विविध योजनाबाबत उपस्थित नागरिकांना माहिती देवून शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले . यामध्ये ग्रामीण भागातील शेतकरी यांचेसाठी मुक्त गायगोठा, ॲग्रीस्टक नोंदणी, जिवंत ७/१२ अशा विविध योजनेचा समावेश होता. तसेच उपस्थित सर्व शेतकरी यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवाजी पाटोळे यांचा सेवापूर्ती समारंभ सोहळा संपन्न

**बीड ।** प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक शिवाजी पाटोळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा रविवारी संपन्न झाला. रविवार दि.२२ रोजी बीड येथे शिवाजी धोंडीराम पाटोळे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ



आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते तर

▶▶ उर्वरित पान २ वर

## सद्‌गुरू संत बाळूमामाच्या मेंढ्या संभाळण्याचा वडवणीच्या महिलांना मान

**●उद्या ह.भ.प. चिचकर महाराजांची किर्तन सेवा**

**वडवणी ।** प्रतिनिधी

तालुक्यातील महिलांना सद्गुरू संत बाळु मामाच्या मेंढ्या / शेळ्या सांभाळण्याचा मान भागवती एकादशी शुभ मुहूर्तावर मिळाला आहे. सद्गुरू संत बाळु मामा हे एक प्रसिद्ध महाराष्ट्रीयन संत होते, त्याचा जन्म ३ ओक्टोबर १८८२ रोजी कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील चिक्कोडी



**सद्गुरू संत बाळु मामाच्या पालखीत आम्ही किर्तन सोहळा ठेवलेला आहे तरी पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा.– महादेव जमाले, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष (शरदचंद्र पवार )**

तालुक्यातील अकोल गावात जन्म झाला. ते धनगर समाजात जन्मले होते. पण त्याची ख्याती सर्व जाती– धर्माच्या लोकांमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

## अपात्र केलेल्या सरपंच सदस्य यांना पात्र ठरवण्याच्या लढ्यास यशः दत्ता काकडे, प्रा.ईश्वर मुंडे

**किल्ले धारूर ।** प्रतिनिधी

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवणारे व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र अधिनियम २००४ तरतुदीनुसार एक वर्षात सादर करणे आवश्यक असते. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूक




मध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांनी जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/ सदस्यांना अपात्र ठरवण्यात आले होते. या अपात्रतेच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे यांनी आ.जयंत पाटील यांच्या कडे ही माहिती सादर केली होती. आ.जयंत पाटील यांनी विधानसभेत व सरपंच परिषद मुंबई यांच्या वतीने राज्याध्यक्ष दत्ता काकडे ▶▶ उर्वरित पान २ वर

## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कोल्हापूर मध्ये ब.स.पा.च्या वतीने विशाल शाहू मेळावा

**बीड ।** प्रतिनिधी

दिनांक २६ जून २०२५ रोजी कोल्हापूर येथे बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त विशाल शाहू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्यास बहुजन समाज पार्टीचे राष्ट्रीय कॉर्डिनेटर मा.राजारामजी तसेच प्रदेशाध्यक्ष मा.एड.सुनीलजी



डोंगरे हे ▶▶ उर्वरित पान २ वर

## चराटा प्राथमिक आरोग्य केंद्रात जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**बीड ।** प्रतिनिधी

एक पृथ्वी एक आरोग्य यासाठी योग या संकल्पनेसह २०२५ चा अकरावा जागतिक योग दिवस चराटा प्राथमिक आरोग्य केंद्र बीड या ठिकाणी उत्साहामध्ये पार पडला. नेहमीप्रमाणे यावर्षी देखील चराटा आरोग्य केंद्रामध्ये प्रख्यात योग प्रशिक्षिका श्रीमती राधा सचिन तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिन उत्साहा मध्ये पार पडला. याप्रसंगी श्रीमती तांबे मॅडम व त्यांची सहकारी



मयुरी बागलाने यांनी उपस्थितांना योगा चे विविध प्रात्यक्षिक करून दाखवले व उपस्थितांना योगाचे जीवनात असणारे महत्व याबद्दल अवगत करून दिले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## योगामुळे मन प्रसन्न राहते -विजय डोगरे

**गेवराई ।** प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद शाळा तलवाडा येथे दिनांक २१ जून रोजी योग दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विजय डोगरे सर यांनी सांगितले की, योगामुळे मन प्रसन्न राहते. व आपले आरोग्य सुधारते. आजच्या धावपळीच्या युगामध्ये योगा आणि व्यायाम अत्यंत गरजेचे आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राम चाळकसर यांनी योगाचे



प्रात्यक्षिक करून दाखवले. सूर्यनमस्कार, अनुलोम–विलोम, भस्त्रिका, कपालभाती अशा विविध प्रकारांची माहिती देऊन प्रत्यक्ष कृती करून दाखवली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री वैद्यनाथ विद्यालय परळीच्या २५ वर्षांपूर्वीच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा उत्साहात संपन्न

### स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा, माजी शिक्षकांचा भावनिक सन्मान

**परळी वै. ।** प्रतिनिधी

श्री वैद्यनाथ विद्यालय, परळी येथील सन २००० सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळावा आयोजित केला. आज रविवार, दिनांक २२ जून २०२५ रोजी श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या खास कार्यक्रमात जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला. एकेकाळी एकत्र शाळेच्या बाकावर बसणारे वर्गमित्र, आज



विविध क्षेत्रात स्थिरावलेले असून, अनेकांनी व्यवसाय, पत्रकारिता, शासकीय सेवा, शिक्षण, वैद्यकीय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते माजी शिक्षकांचा सन्मान समारंभ. विद्यार्थ्यांनी आपल्या आदरणीय शिक्षकांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. शिक्षकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा समोर पाहून, आज पुन्हा वर्ग भरल्यासारखे वाटले, असे भावनिक उद्गार काढले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर सामूहिक प्रार्थना व स्वागतगीत सादर करण्यात आले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापली ओळख, सध्याची व्यावसायिक स्थिती ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK